# प्रकरण 7

# निष्कर्ष

# प्रकरण सातवे

# निष्कर्ष

श्रीमती इंदिरा गांधी यांनी स्पष्ट केलेल्या अनेक संकल्पना व सिध्दांतामुळे राजकीय क्षेत्राला किंवा राकीय तत्त्वज्ञानाला चांगले योगदान लाभले आहे. त्यांच्या विचारांचे प्रमुख पैलू सारांशाने निष्कर्ष स्वरूपात मांडण्यात आले आहेत.

'श्रीमती इंदिरा गांधी यांचे विचार विश्वः एक तात्त्वीक विश्लेषण' या संशोधन विषयाचा आराखडा प्रस्तावनेच्या रूपात प्रकरण एकमध्ये मांडण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाची गृहीतके, महत्त्व व हेतू आदींचे विवेचन केले आहे. प्रस्तुत प्रबंधातील प्रकरणांची रचना स्पष्ट करून संशोधनाची अभ्यास पध्दती नमुद करण्यात आली आहे.

तत्त्वज्ञानाचा अभ्यास प्रामुख्याने अस्तीक व नास्तीक तत्त्वज्ञान अशी विभागणी करून करण्यात येतो. वेदांचे प्रामाण्य मान्य करणारे आस्तिक तत्त्वज्ञान होय. तर नास्तिक तत्त्वज्ञान हे वेदांचे प्रामाण्य अमान्य करतात. या अनुषंगाने श्रीमती इंदिरा गांधींचा समावेश हा 'अस्तिक' तत्त्वज्ञानात होतो. श्रीमती इंदिरा गांधी या भारतीय तत्त्वज्ञानाने प्रभावीत झाल्या होत्या. त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानातील विचार हे प्रत्यक्षपणे जीवनात उतरविले. राजकीय क्षेत्राला नवीन दिशा प्राप्त करून दिली. श्रीमती इंदिरा गांधी यांचे विचार जाणून घेण्यासाठी प्रस्तुत प्रबंधात प्रकरण दोन मध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांचे व्यक्तीमत्त्व व कार्य या अनुषंगाने प्रकरणाची रचना करण्यात आली. त्यात कौंटूबीक स्थिती, शालेय जीवन आणि त्यांच्या व्यक्तीमत्त्वाला प्रभावित करणारे घटक, त्यांचे वैवाहीक जीवन व त्याच्या राजकीय जीवनात प्रवेश या संदर्भात विचार करण्यात आला आहे. एकूणच अष्टपैलु व्यक्तीमत्त्वाची जडण-घडण या संदर्भात विशद केले आहे.

राजकीय जीवन व्यक्तीच्या जीवनाचा एक भाग होय. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात राजकीय संकल्पनाचा अभ्यास हा राजकीय तत्त्वज्ञानात केला जातो. राजकीय संकल्पनांची तात्विक मांडणी या भागात केली जाते. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या राजकीय जीवनाचा आणि

त्यांच्या संकल्पनांचा विचार विशद करण्यासाठी प्रस्तुत प्रबंधात श्रीमती इंदिरा गांधी यांचे राजकीय तत्त्वज्ञान या प्रकरणची रचना केली आहे. या प्रकरणात राजकीय जीवनाच्या दृष्टीकोनातून मूल्यांचा लावलेला अर्थ, लोकशाही संकल्पना, लोकशाहीचे आधारभूत घटक, त्याचा सामाजवादी दृष्टीकोन, स्वातंत्र्य, समता या बाबतीतील त्यांचे विचार स्पष्ट केले आहेत. श्रीमती इंदिरा गांधी यांचे परराष्ट्र धोरण, आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील त्यांची कामगिरी व या संदर्भातील विचार क्षेत्रातील स्पष्ट झाले आहेत. श्रीमती इंदिरा गांधी यांनी सुरक्षेच्या दृष्टीने शांतता या मूल्यांचा केलेला उपयोग या सर्व बाबी या प्रकरणात मांडल्या आहेत.

व्यक्ति हा सामाजशील प्राणी आहे. व्यक्तीच्या जीवनातील अनेक समस्यांपैकीच सामाजिक समस्यांचा विचार केला जातो. श्रीमती इंदिरा गांधी यांचे समाजिक विचार हे स्पष्ट होण्याकरिता 'श्रीमती इंदिरा गांधी यांचे सामाजिक तत्त्वज्ञान' या प्रकरणाची रचना करण्यात आली आहे. त्यात त्यांच्या स्त्री विषयक दृष्टीकोन, महिलांचे सशक्तीकरण, अस्पृश्यता या सामाजिक समस्येच्या संदर्भात त्यांचे विचार व भुमिका विशद केली आहे. सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने हिंदू-मूस्लीम ऐक्याबाबत त्यांची भूमिकाही स्पष्ट करण्यात आली आहे.

शिक्षण हा व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वाचा घटक होय. शिक्षण हे अर्वांगीण विकासाचे साधन होय. त्या अनुषंगाने 'श्रीमती इंरिा गांधी यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान' या प्ररकरणाची रचना झाली आहे. शिक्षणातील महत्त्वाचा टप्पा म्हणुन माध्यमिक व प्राथमिक शिक्षणाचा विचार केला जातो. या प्रकरणात श्रीमती इंदिरा गांधी यांच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात असणारे विचार, उच्च शिक्षणाच्या संदर्भातील त्यांची भूमिका व शैक्षणिक क्षेत्रातील आरक्षण या सर्व घटकांना या प्रकरणात प्रस्तुत केले आहे.

आधुनिक युगात संपत्ती हेच मानवाचे परम् पुरुषार्थ मानले जाते. व्यक्तीला सुव्यवस्थीत जीवन जगण्याकरीता पैशाची आवश्यकता असते. व्यक्तीच्या विकासाचे मोजमाप पैशाच्या आधारावर केले जाते. विकासातील या घटकाना 'श्रीमती इंदिरा गांधी यांचे आर्थिक तत्त्वज्ञान' या प्रकरणात विशद केले आहेत. त्यात श्रीमती इंदिरा गांधी यांनी त्यांच्या कार्यकाळात आर्थिक धोरणाचा आढावा घेतला आहे. या दृष्टीने समाजातील प्रत्येक घटकाला

विकासाची समान संधी प्राप्त होण्यासाठी त्यांची भूमीका स्पष्ट झाली आहे. आर्थिक विषमता कमी होण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत केलेली बँकाची भूमीका, बँकाच्या राष्ट्रीयीकरणाचा घेतलेला निर्णय, आर्थिक विकासा करीता सपष्ट केलेला दहा कलमी कार्यक्रम, पंचसूत्री आर्थिक कार्यक्र, रूपयाचे केलेले अवमूल्यन औद्योगिक व कृषी क्षेत्रात विकासासाठी घेतलेले कृतीकार्यक्रम, बेकारी सारखी आर्थिक विषमता वाढविणारी समस्या या सर्वांच्या संदर्भातील त्यांची भूमीका या प्रकरणात विशद झाली आहे.

प्रस्तुत अध्ययनाअंतर्गत श्रीमती इंदिरा गांधी यांचे विचार विश्व: एक तात्त्विक विश्लेषण' या अनुषंगाने आतापर्यंतचे विवेचन करण्यात आले. प्रबंधातील गृहीतकांच्या आणि अध्ययनाच्या आधारे सदरील निष्कर्ष मांडयात आला आहे.

प्राचीन काळापासूनच स्त्री-पुरूष यांच्यात भेदाभेद केला जातो. ईश्वराने सर्वांची निर्मिती केली असल्यामुळे सहाजिकच मानवातील हा भेदाभेद अयोग्य-अनैतीक स्वरूपाचा आहे. समानता या तत्त्वाचा विचार करून पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांना देखिल विकासाची संधी प्राप्त व्हावी या अनुशंगाने काळानुसार प्रयत्न झाले आहेत. आधुनिक युगात म.गांधी, म.फुले, सावित्रीबाई फुले या थोर व्यक्तींनी स्त्री-पुरुषातील भेदाभेद संपविण्यासाठी कार्य केले आहेत. याचाच परिणाम असा झाला की, शिक्षणाचा आधार घेवून स्त्रीयांनी प्रत्येक क्षेत्रात कार्य करण्यास सुरूवात केली. यामध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांचा देखिल समावेश होतो.

श्रीमती इंदिरा गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात विचार केला असता असे स्पष्ट होते की, जन्मत:च राजकीय वारसा लाभलेल्या श्रीमती इंदिरा गांधी यांचे व्यक्तिमत्त्व हे अष्टपैलू होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात महत्त्वाचे पैलू म्हणजे त्यांची साहसी वृत्ती, निर्णय क्षमता व आत्मविश्वास हे होय. ही त्यांची बलस्थाने होती. यांच्या आधारावर श्रीमती इंदिरा गांधी यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेवून ते कृतीत आणले आहेत.

भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्यामुळे भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव त्यांच्या विचारांवर झालेला आहे. अनेक देशातील संस्कृतीचा अनुभव व अभ्यास करून आधुनिक दृष्टिकोनातून राष्ट्राचा विकास कसा साधता येईल याचाच विचार त्यांनी केला. आध्यात्मिक

साधनेला जीवनात त्यंनी महत्त्व दिले. त्यामुळे आपण सावरले जातो असे त्यांना वाटत होते. याचाच उपयोग त्यांनी आपल्या पुढील आयुष्यात करून घेतला असेच स्पष्ट होते.

राजकीय जीवन जगत असतांना, राजकीय क्षेत्रात कार्य करत असतांना प्रत्येक व्यक्तीला जीवनविषयक मूल्यांची जाणीव असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक काळाने याचे दाखले दिले आहेत की, ज्या - ज्या वेळेस या जीवन विषयक मूल्यांची पायमल्ली केली त्या-त्या वेळेस देश अवनतीकडे किंवा अधोगतीकडे झुकलेला आहे. ज्या वेळेस राष्ट्राला योग्य नेतृत्व मिळाले त्या-त्या वेळेला राष्ट्र उन्नतीकडे गेले. हे प्रत्येक राष्ट्राचेच उदाहरण घेता येते. भारताच्या राजकीय स्वातंत्र्यानंतर पंडीत नेहरू, लाल बहादुर शास्त्री आणि श्रीमती इंदिरा गांधी यांच्या सारख्या महान व्यक्तिमत्त्वाचा किंवा नेतृत्वाचा उपयोग झाला आहे.

श्रीमती इंदिरा गांधी यांनी बालवयातच स्वातंत्र्य चळवळीत सभाग घेवून राष्ट्र सेवा करण्यास सुरूवात केली आणि आपल्या धाडसी व निर्भीड वृत्तीने, निर्णय क्षमतेने, आत्मविश्वाने राष्ट्राला उर्जीत अवस्थेत नेले. हे करत असतांना त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

लोकशाही शासन पध्दतीला महत्त्वाचे मानून त्यानुसार शासन चालविले, कारण लोकशाहीत स्वातंत्र्य-समता-न्याय या तत्त्वांचा अंर्तभाव असतो किंवा यांच्या शिवाय लोकशाहीची संकल्पना पूर्णच होवू शकत नाही हे त्यांनी जाणले होते. अंर्तगत मूल्यांच्या आधारावर अनेक समस्या सोडविता येतात, हे त्यांनी मानले होते. मूल्यांची जोपासना ही अंतर्गत असते. लोकशाहीचा विचार केवळ शासन पध्दत म्हणून न करता जीवनाचे तत्त्वज्ञान म्हणून केले. परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात श्रीमती इंदिरा गांधी यांनी अलीप्ततावादाचा स्वीकार केला आणि जागतिक पातळीवर मुत्सदी नेत्या म्हणून नावलौकीक मिळविले. याचे उदाहरण म्हणजे भारताला रशियासारखा बलाढय मित्र मिळवून दिला किंवा भारत रशिया मैत्री करार हा होय. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतता व सहकार्याचे धोरण स्वीकारले. आंतरराष्ट्रीय दबावात न येता राष्ट्राच्या संरक्षणाच्या दृष्टीने कणखर धोरण आखले याचे उदाहरण म्हणजे पोखरण येथील अणुचाचणी हे होय. शांततेसाठी त्यांनी कार्य केले व राष्ट्राला केवळ राष्ट्रीय पातळीवरच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकीक केले.

बांगला देश निर्मीतीने इतिहासाच नव्हे तर उपमहाखंडाचा भूगोलही बदलला आहे. भारताच्या व इंदिरा गंधीच्या जीवनातील गौरवपूर्ण क्षण होय. यामुळे भारताला जगात अभूतपूर्व प्रतिष्ठा मिळवून दिली.

शांततेसाठी कार्य केलेल्या त्या एकमेव स्त्री नेत्या ठरल्या. म्हणूनच श्रीमती इंदिरा गांधी यांना विश्वशांती आणि मानवतेसाठी केलेल्या कार्याच्या संदर्भात अमेरिकेने 'शांतीदूत' पुरस्काराने सन्मानीत केले. हे त्याचेच प्रतीक होय. आंतरराष्ट्रीय सुरक्षितता केवळ शस्त्रा अस्त्राच्या बळावर असते असे नव्हे तर परस्परात सहकार्याचे संबंध असतील तर सुरक्षीतता राखता येते हे श्रीमती इंदिरा गांधी यांनी कृतीतून दाखवून दिले.

समाजवाद ह्या व्यक्ति -व्यक्तीतील भेद नाहीसा करेल विषमतेच्या विरोधी समाजवाद असतो. यामुळे श्रीमती इंदिरा गांधी यांनी समाजवाद तत्त्वाला आदर्श मानून कृतीतून दाखविले हे समाजावादाचे मुळ तत्व आहे. या अनुषांगाने कृतीत आणले. सर्व धर्माना समान मानले. या संदर्भात त्यांच्या वैयक्तीक जीवनातील उदाहरण म्हणजे फिरोजशहा यांच्याशी झलेला विवाह हे होय आणि प्रत्येक क्षेत्रात सर्व व्यक्तीना कार्य करण्याची दिलेली संधी. विषमता केवळ व्यक्ति-व्यक्तीतच नसावी तर राष्ट्रा-राष्ट्रात देखील विषमता नसावी या तत्त्वाला इंदिरा गांधी यांनी महत्त्वाचे मानले. भारतीय घटनेच्या सरनाम्यात निधर्मी व समाजवादी शब्दाचा समावेश करून या मूल्यांच्या सरंक्षणासाठी त्या आयुष्यभर झटल्या.

स्वातंत्र्य हे व्यक्तीचे जीवन विषयक मुल्य आहे. श्रीमती इंदिरा गांधी यांनी मानवता व स्वातंत्र्य या मूल्यांना जीवन विषयक दृष्टीकोन मानले. जगातील प्रत्येक राष्ट्राला व्यक्तीला स्वातंत्र्य असले पाहिजे हे कृतीतून स्पष्ट केले. प्रतिकूल परिस्थितीतही बांगला देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. हे त्यांच्या निर्भय व धाडसीवृत्तीचे उदाहरण होय. या करीता भारत सरकारने 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित केले तर बांगला देशाने मरणोत्तर त्यांना 25 जुले 2011 मध्ये 'बांगला देश स्वाधीनता सन्मान' या पुरस्काराने सन्मानीत केले. मानवतावादी दृष्टिकोन स्पष्ट होतो. मानवता हाच सर्वश्रेष्ठ धर्म होय असे मानले. प्रतिकुल परिस्थितीत निर्वासीतांची केलेली सेवा हे त्याचे उदाहरण होय.

संहिष्णुता हाच आपला मूळ पाया आहे किंवा तत्त्व आहे हे श्रीमती इंदिरा गांधी यांनी कृतीतून स्पष्ट केले.

प्रत्येक व्यक्ती हा सामाजिक जीवन जगत असतो. प्रत्येक काळात सामाजिक समस्या ह्या भिन्न - भिन्न स्वरूपाच्या असतात. श्रीमती इंदिरा गांधी यांनी जनतेच्या प्रत्यक्ष सहभागाशिवाय कोणताच सामाजिक बदल शक्य नाही असे स्पष्ट केले. त्यांनी कोणताच भेदाभेद मान्य केला नसल्यामुळे स्त्री-पुरूष यांच्यातील भेद मान्य केला नाही कार्याच्या अनुषंगाने सर्वव्यक्ती सारखेच असतात. प्रत्येकाला व्यक्तीच्या दृष्टिकोनातूनच पाहिले पाहिजे याचे उदाहरण इंदिरा गांधी हे होय. 20 व्या शतकातील सर्वात लोकप्रीय नेत्या म्हणून त्यांची गणना केली जाते. या अशा पहिल्या महिला नेत्या आहेत. प्रत्येक क्षेत्रात स्त्री कार्य करून आपले कर्तृत्व व क्षमता दाखवू शकते. सर्व स्त्रीयासाठी त्या एक प्रेरणास्थान आहेत.

अस्पृश्यता ही एक सामाजिक समस्या आहे. या दृष्टीने इंदिरा गांधी यांनी सर्व व्यक्तीला समान मानले. प्रत्येक व्यक्तीला विकासाची संधी प्राप्त व्हावी म्हणून स्कॉलरशिप, शिक्षण क्षेत्रात आरक्षण या सारख्या योजना आखून अस्पृशता निर्मूलन केले.

हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी इस्लामिक राष्ट्राला मित्र राष्ट्र बनविण्याचा प्रयत्न केले. हिंदू -मुस्लीम ऐक्य टिकविले. स्वातंत्र्यानंतर ज्या हिंदू - मुस्लीम दंगली उसळल्या त्यात सामाजिक ऐकत्र टिकावे, शांतता अबाधित रहावे म्हणून त्यांनी प्रत्यक्षपणे कार्य केले.

राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीकोनातुन श्रीमती इंदिरा गांधी यांनी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी प्रदर्शीत होणाऱ्या पथकांची सुरूवात त्यांनी केली.

समाजाचे किंवा राष्ट्राचे महत्त्वपूर्ण अंग म्हणून सांस्कृतिक मुल्यांचा विचार होतो. सांस्कृतिक मूल्यांचे इंदिरा गांधी यांनी जतन केले. नाटक, संगीत काव्य, नृत्य आदीमध्ये रस होता. त्या 1965-74 या कालावधीत संगीत नाट्य अकादमीच्या अध्यक्षा होत्या.

प्रतिवर्षी दिल्लीमध्ये प्रजासत्ताक दिनाचा सोहळा साजरा होतो या वेळी भारताच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारी नृत्यपथके वेगवेगळ्या राज्यातून दिल्लीत येत असतात हि प्रथा आताही रूढ आहे. या प्रथेच्या कल्पक व योजक इंदिरा गांधी या आहेत.

ज्ञान हे व्यक्तीचे महत्त्वपूर्ण अंग होय या विषयीचा विचार करून शैक्षणिक क्षेत्रात विकासाच्या दृष्टीने बदल व्हायला पाहिजे आणि विद्यापीठीय स्तरावर विविध अभ्यासक्रम असावेत हे तत्त्व त्यांनी स्पष्ट केले. या करीता त्यांनी विद्यापीठीय स्तरावर विविध अभ्यासक्रमाला प्राधान्य दिले. संशोधनवृत्ती वाढली पाहिजे, तर खऱ्या अर्थाने शिक्षण घेतले असे होईल असे त्यांनी मानले. आत्मविश्वास वाढला तर प्रगतीचे पाहिले पाऊल होय. शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणून आत्मविश्वासाचा विचार त्यांनी केला.

व्यक्ती व राष्ट्रविकासाचे महत्त्वाचे साधन म्हणून पैसा किंवा अर्थ याला विचारात घेतले जाते. राष्ट्रांची आर्थीक उन्नती व्हावी कारण अर्थविकासावरच राष्ट्रविकासाचा पाया असतो. हे श्रीमती इंदिरा गांधी यांनी कृतीच्या आधारे सिध्द केले. आर्थिक प्रगतीकडे विशेष लक्ष पुरविले. आर्थिक विषमता हि सर्व समस्याचे मूळ आहे. असे मानून आर्थिक विषमता कमी करण्यात इंदिरा गांधी यशस्वी झाल्या. याकरिता त्यांनी जे विविध निर्णय घेतले त्यात बँक राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तणखे बंद करणे असे आर्थीक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे धाडसी निर्णय घेतले. आर्थिक विकासाचे साधन म्हणून कृषी क्षेत्राचा विचार केला. हरितक्रांती घडवून आणली, औद्योगिक प्रगती केली, श्वेतक्रांती घडवून आणली. परस्पर सहकार्यावरच आर्थिक विकास साधता येतो असे मानून राष्ट्राराष्ट्रातील आर्थिक विषमता कमी व्हावी यासाठी प्रयत्न केले.

राष्ट्राच्या विकासात वैज्ञानिक क्षेत्राचा महत्त्वाचा वाटा असतो हे लक्षात घेऊन त्यांनी वैज्ञानिक प्रगती साधली.

श्रीमती इंदिरा गांधी यांच्या नेतृत्त्वाखालीच सागरी, संशोधनाला विशेष गती आली. कारण अंटार्टिका येथे भारतीय वैज्ञानिकांच्या तीन वेळा पाठविण्यात आलेल्या गटाने केलेली कामगिरी हे सर्व इंदिरा गांधी नेतृत्त्वपदी आल्यानंतर झाले. इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात वैज्ञानिक प्रगतीत भारताचा तिसरा क्रंमाक होता.

श्रीमती इंदिरा गांधी यांनी राष्ट्रविकासात महत्त्वाची भूमिका बजावली. कारण लष्करी सामर्थ्यात पाचवा क्रमांक, अणुशक्तीचे तंत्रज्ञान अवगत असलेले सहाव्या क्रमांकाचे राष्ट्र, अवकाशात प्रवेश करणारे सातव्या क्रंमाकाचे, औद्योगिक सत्ता असलेले दहाव्या

क्रमांकाचे राष्ट्र ठरले. भारताचा आधुनिकतेकडे नेण्यात श्रीमती इंदिरा गांधी यांचा सिहांचा वाटा आहे. रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत राष्ट्र विकास साधणाऱ्या त्या एकमेव महिला नेत्या आहेत. म्हणूनच त्यांचे नेतृत्व हे निर्भीड व उतुंग स्वरूपाचे होते.

सद्यपरिस्थितीत संसदेचा दर्जा खालावलेला आहे, राजकीय क्षेत्रात नैतीकतेचा अभाव नेतृत्वाच्या संदर्भात विचार केला तर आत्मविश्वास, निर्णयक्षमता राहिलेली नाही बिकट स्वरूपाच्या राष्ट्रीय व सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत श्रीमती इंदिरा गांधी यांचे विचार, नेतृत्व, निर्णय क्षमता निर्भीडवृत्ती ही उपयुक्त आहे. त्यांचे हे सर्व गुण राष्ट्राच्या विकासाकरीता अनंत काळासाठीच आहेत. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आढावा घेतला तर हेच सिध्द झाले की, वर्तमान व भविष्याकरिता श्रीमती इंदिरा गांधी यांचे विचार व कार्य अत्यंत मौल्यवान व प्रेरक असेच आहेत. प्रत्येक क्षेत्रातील प्रगती, आंतरराष्ट्रीय स्तरावरील राष्ट्राचे नाव हेच स्पष्ट करते की, श्रीमती इंदिरा गांधी यांच्या रूपात भारताला मिळालेले व्यक्तिमत्व एक सुवर्णसंधी होय. हि संधी आपल्या राष्ट्राकरीता त्यांच्या विचाराच्या रूपाने सतत उपयुक्त राहील.